सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597442, 443, 450
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक
तात्काळ

क्रमांक: २(३)/एनजीसी/मान्यता/पीसीआय/२०२०/८२५
दिनांक : 08 JAN 2021

प्रति,
प्राचार्य,
सर्व विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था,
महाराष्ट्र राज्य

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीताच्या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या मान्यता प्रक्रीयेबाबत.....

संदर्भ :- १) फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र. F.No.3-५२/२०२०-PCI/७६५६, दि. ३०.१२.२०२०
२) फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र. F.No.3-५२/२०२०-PCI/७६८०, दि. ३१.१२.२०२०

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे विद्यमान संस्थांना त्यांचे पोर्टलवर दिनांक ०४.०१.२०२१ ते दि. ३१.०१.२०२१ पर्यंत अर्ज सादर करण्यास सूचित केले आहे. संदर्भीन पत्राचे अवलोकन करता खालील अर्जांसाठी राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र अनिवार्य केलेले आहे.

- नवीन बी. फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे [Introduction of B. Pharmacy New Course]
- संस्थेच्या / ट्रस्टच्या नावात बदल करणे [Change in Name of Institution / Trust]
- संस्थेचा पत्ता / ठिकाण बदल करणे [Change of address / Location of Institution]
- संस्था बद करणे [Closure of institution]

राज्यातील विद्यमान पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी औषनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थापैकी ज्या संस्था वरील अर्ज फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांचेकडे करणार आहेत, अशा संस्थांनी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क भरलेल्या पावतीसह दि. १५.०१.२०२१ पर्यंत सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करण्यात यावा. सदर दिनांकानंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांसाठी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थाना आपले स्तरावरुन अग्रेषित करावे.

f:\vijay_06022018\kedare\approval process\2021\cercular.docx